# मंत्रिमंडळ निर्णय

## दि. ३ जुलै २०१७

## (बैठक क्र. १३७ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
| --- | --- | --- |
| १. | महाराष्ट्र ग्रा.पं. अधिनियमात सुधारणा<br>**राज्यातील सरपंचांची निवड आता थेट जनतेतून होणार** | ग्रामविकास |
| २. | सांगली-सोलापूरमधील दुष्काळी भागाला वरदान<br>**कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पास चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता** | जलसंपदा |
| ३. | **नैना क्षेत्रातील गावांच्या पाण्यासाठी कोंढाणे धरण सिडकोला हस्तांतरित** | जलसंपदा |
| ४. | श्री साईबाबा संस्थानच्या अधिनियम-२००४ मध्ये सुधारणा<br>**कार्यकारी अधिकारी आता मुख्य कार्यकारी अधिकारी** | विधि व न्याय |
| ५. | **कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना तीन आगाऊ वेतनवाढी** | विधी व न्याय |
| ६. | **वाहन नोंदणीसाठी आकारल्या जाणाऱ्या एकरकमी मोटार वाहन करामध्ये वाढ** | परिवहन |
| ७. | **रत्नागिरी वीज प्रकल्पास व्हॅट,सीएसटी मधून सूट** | ऊर्जा |
| ८. | **अनधिकृत बांधकामावरील शास्तीच्या तरतुदीमध्ये सुधारणेचा अध्यादेश पुन्हा पुनर्प्रख्यापित करण्यास मान्यता** | नगर विकास (२) |
| ९. | एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे<br>**बळकटीकरण व पुनर्संरचना योजना राज्यातील उर्वरित १५ जिल्ह्यांत राबविणार** | महिला व बालविकास |
| १०. | ग्रामरक्षक दलांच्या स्थापनेची प्रक्रिया वेगवान<br>**तहसीलदारांनी नेमलेल्या अधिकाऱ्याच्या उपस्थितीतही आता होणार ग्रामसभा** | राज्य उत्पादन शुल्क |
| ११. | **अंबाझरी उद्यान आणि तलावाच्या विकासासाठी जमिनीचे व्यवस्थापन आता एमटीडीसीकडे** | महसूल |
| १२. | महाराष्ट्र मुद्रांक नियमात सुधारणा<br>**वार्षिक मूल्यदर तक्त्यांसोबत मार्गदर्शक सूचनांचा समावेश** | महसूल विभाग |

महाराष्ट्र ग्रा.पं. अधिनियमात सुधारणा

**राज्यातील सरपंचांची निवड आता थेट जनतेतून होणार**

राज्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचांची निवड थेट जनतेतून करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम-१९५८ मधील विविध कलमांमध्ये सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली.

राज्यात निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांमधून सरपंचाची निवड करण्यात येते. देशातील गुजरात आणि मध्य प्रदेशासारख्या राज्यांत मात्र सरपंचांची निवड थेट जनतेमधून करण्यात येते. राज्यातही अशा पद्धतीने सरपंचांची थेट निवड करता येईल काय, या शक्यतेचा अभ्यास करण्यासाठी द्विसदस्यीय अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार या गटाने दोन्ही राज्यांमध्ये असलेल्या निवडणूक पद्धतीचा अभ्यास करुन आपला अहवाल शासनास सादर केला. या अहवालानुसार आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत संबंधित ग्रामपंचायत अधिनियमात दुरूस्तीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

या निर्णयानुसार ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील मतदारांमधून गुप्त मतदानाने सरपंचाची निवड करण्यात येणार असून सरपंच हा या पंचायतीचा अध्यक्ष असेल. सरपंच पदासाठी किमान सातवी उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यात आली आहे. मात्र, ही अर्हता १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेल्या व्यक्तीस लागू राहणार आहे. या प्रक्रियेतून निवडण्यात येणारे सरपंच पद पाच वर्षांच्या मुदतीसाठी राहील.

त्याचप्रमाणे अधिनियमातील विविध कलमांत करण्यात आलेल्या सुधारणांनुसार सरपंच किंवा उपसरपंच निवडून आल्याच्या दिनांकापासून दोन वर्षेपर्यंत व ग्रामपंचायतीचा कार्यकाल संपण्याच्या अगोदर सहा महिने कोणताही अविश्वास ठराव आणता येणार नाही. तसेच यादरम्यानच्या काळात जर अविश्वास ठराव फेटाळला गेल्यास त्यानंतर पुढील दोन वर्षे असा अविश्वास ठराव आणता येणार नाही. त्याचप्रमाणे पंचायतीशी विचारविनिमय करून ग्रामसभा सरपंचांच्या अध्यक्षतेखाली एक किंवा अधिक ग्रामविकास समित्यांची स्थापना करणार आहे.

-----o-----

सांगली-सोलापूरमधील दुष्काळी भागाला वरदान

## कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पास

## चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता

सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील कायमस्वरुपी दुष्काळग्रस्त परिसराला वरदान ठरणाऱ्या कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी ४ हजार ९५९ कोटी ९१ लाख रुपये खर्चाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय अहवालास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे दोन्ही जिल्ह्यांतील २८८ गावांचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी सुटणार आहे.

बांधकामादरम्यान दरसूचीतील बदल, जास्त दराची निविदा स्वीकृती, भूसंपादनाच्या वाढलेल्या किंमती (विशेषत: नवीन भूसंपादन कायद्यामुळे), संकल्पचित्रातील बदल, अपुऱ्या तरतुदी तसेच इतर अनुषंगिक खर्चामुळे प्रकल्प किंमतीत वाढ झाली आहे. या कारणांमुळे महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाने २०१३-१४ च्या दरसूचीवर आधारित चतुर्थ सुधारित प्रशासकीय अहवाल सादर केला. या अहवालास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती-२ ची शिफारस आहे. त्यानुसार प्रकल्पाच्या एकूण ४ हजार ९५९ कोटी ९१ लाख रुपये खर्चाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय अहवालास मान्यता देण्यात आली.

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प हा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अंतर्गत असून या प्रकल्पांतर्गत ताकारी व म्हैसाळ अशा दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजना आहेत. ताकारी उपसा सिंचन योजनेचा उद्‌भव कृष्णा नदीवर ताकारी गावाजवळ आहे. या योजनेद्वारे एकूण ४ टप्प्यामध्ये ९.३४ अब्ज घनफूट पाणी उचलून त्याद्वारे सांगली जिल्ह्यातील खानापूर, तासगाव, मिरज, पलूस, कडेगाव, वाळवा या तालुक्यांतील एकूण २७ हजार ४३० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजित आहे.

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचा उद्‌भव कृष्णा नदीवर म्हैसाळ गावाजवळ आहे. या योजनेद्वारे एकूण ६ टप्प्यामध्ये १७.४४ अब्ज घनफूट पाणी उचलून त्याद्वारे सांगली जिल्ह्यातील मिरज, कवठेमहांकाळ, तासगाव, जत आणि सोलापूर जिल्ह्यातील सांगोला व मंगळवेढा या तालुक्यातील एकूण ८१ हजार ६९७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.

कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेतून एकूण १ लाख ९ हजार १२७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. या प्रकल्पांतर्गत एकूण पाणी वापर २६.७८ अब्ज घनफूट इतका आहे. यापैकी कोयना धरणातून १९.०७ अब्ज घनफूट व कृष्णा नदीतून ७.७१ अब्ज घनफूट इतका पाणी वापर नियोजित आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत या प्रकल्पाचा समावेश असून या प्रकल्पासाठी जानेवारी २००४ मध्ये १९८२ कोटी ८१ लाख खर्चास तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

----०----

**नैना क्षेत्रातील गावांच्या पाण्यासाठी**
**कोंढाणे धरण सिडकोला हस्तांतरित**

नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र अर्थात नैना (NAINA) अंतर्गत येणाऱ्या २७० गावांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून कर्जत तालुक्यातील कोंढाणे धरण सिडकोला हस्तांतरित करण्यास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच कोंढाणे प्रकल्प हा पाणी पुरवठा प्रकल्प म्हणून घोषित करण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

नवी मुंबई प्रभावित अधिसूचित क्षेत्राचा विकास करण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची नियुक्ती करण्यात आली आहे. हा प्रकल्प ६४४ वर्ग कि.मी. क्षेत्रावर राबवण्यात येणार असून या प्रकल्पात २७० गावांचा समावेश आहे. या प्रकल्पासाठी लागणारी सध्याची तसेच भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंपदा विभागाकडून कोंढाणे प्रकल्प -आहे त्या स्थितीत◦ सिडकोकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या प्रकल्पासाठी आजपर्यंत झालेल्या बांधकामाचे मूल्यांकन करुन हा खर्च सिडकोने कोकण पाटबंधारे महामंडळास द्यावयाचा आहे. तसेच या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या आवश्यक मान्यता घेऊन धरणाचे संकल्पन सिडकोने मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (नाशिक) यांच्याकडून करुन घ्यायचे आहे. या प्रकल्पासाठी अंमलबजावणी संस्था नेमण्याचे अधिकार सिडकोला असतील. कोंढाणे प्रकल्पातील एकूण १०५.९७ दलघमी पाणीसाठ्यापैकी १०.५५ दलघमी पाणी शेतीसाठी वापरण्यास प्रचलित सिंचन दरानुसार होणारी पाणीपट्टीची रक्कम सिडकोला देण्याच्या अटीवर देण्याचे या निर्णयादरम्यान मान्य करण्यात आले. तसेच या प्रकल्पाच्या अंमलबजावणी संदर्भात यापूर्वी एसीबीमार्फत सुरु असलेली चौकशी कोणत्याही प्रकारे बाधित होणार नाही.

-----०-----

श्री साईबाबा संस्थानच्या अधिनियम-२००४ मध्ये सुधारणा

## कार्यकारी अधिकारी आता मुख्य कार्यकारी अधिकारी

शिर्डी (जि. अहमदनगर) येथील श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारी या पदाचे नामाभिधान मुख्य कार्यकारी अधिकारी असे करण्यासह शताब्दी महोत्सवाच्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थापन समिती आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वित्तीय अधिकारात वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यासाठी श्री साईबाबा संस्थानच्या अधिनियम-२००४ मध्ये सुधारणा करण्यास आणि त्याबाबतचा अध्यादेश राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठविण्यासही मान्यता देण्यात आली.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ अन्वये शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेचे पूनर्गठन करण्यात आले असून संस्थान राज्य शासनाच्या थेट नियंत्रणाखाली आणण्यात आले आहे. श्री साईबाबा संस्थान आणि संस्थानाद्वारे संचलित शैक्षणिक आणि वैद्यकीय संस्थांच्या दैनंदिन कामकाजात या कायद्यातील तरतुदीनुसार प्रशासकीय समस्या उद्भवत होत्या, त्यामुळे या कायद्यात सुधारणा करणे आवश्यक होते. त्याबरोबरच श्री साईबाबा महासमाधी शताब्दी महोत्सव येत्या ऑक्टोबरपासून सुरू होत असून त्यानिमित्ताने विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने कृती आराखडा तयार केला आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी समितीच्या वित्तीय अधिकारात वाढ करणे आवश्यक होते.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कार्यकारी अधिकारीपदी भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी नियुक्त करण्यात येतो. त्यामुळे या अधिकाऱ्याच्या दर्जानुसार पदाचे नामाभिधान मुख्य कार्यकारी अधिकारी करण्यास आणि त्यांना पाच लाख रूपयांपर्यंतच्या खर्चाचे विशेष वित्तीय अधिकार देण्याची सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली. व्यवस्थापन समितीच्या बैठकीत आवश्यक गणपूर्ती नसल्यास बैठक तीस मिनिटांसाठी तहकूब करून त्यानंतर गणपूर्तीच्या अटीशिवाय बैठकीचे कामकाज करता येईल. तसेच श्री साईबाबा समाधी महाशताब्दी महोत्सावाच्या विकास आराखड्यातील प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना २५ लाखापर्यंतच्या खर्चास तर एक कोटी रूपयांपर्यंतच्या खर्चास व्यवस्थापन समितीला अधिकार देण्यास मान्यता देण्याची तरतूद करण्यात आली आहे. याबरोबरच सल्लागार समितीमध्ये नवीन सदस्य नेमण्याची नियमावली, स्थावर व जंगम मालमत्ता, अभिलेख, पत्रव्यवहार, आराखडे लेखे व दस्तऐवज या निरीक्षणासाठी सहसचिव दर्जाचा अधिकारी नियुक्त करणे, समितीचे ठराव शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी ठराव शासनाकड पाठविणे, लेखापरीक्षकाचा अहवाल ३० सप्टेंबरपर्यंत सादर करणे आणि समिती विसर्जित केल्यास किंवा अधिक्रमण केल्यास प्रशासकपदी विभागीय आयुक्त दर्जाच्या व्यक्तीची प्रशासक म्हणून निवड करण्याच्या सुधारणेस मंजुरी देण्यात आली. श्री साईबाबा शताब्दी सोहळ्याच्या कामास तातडीने सुरूवात करण्यासाठी या अधिनियमात सुधारणा करण्याचा अध्यादेश राज्यपालांच्या मंजुरीसाठी पाठविण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

-----०-----

विधी व न्याय विभाग

## कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना तीन आगाऊ वेतनवाढी

राज्यातील दुय्यम न्यायालयामधील कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण (L.L.M.) घेतलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांना न्या. शेट्टी आयोगाच्या शिफारशींनुसार तीन आगाऊ वेतनवाढी देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

न्यायिक अधिकाऱ्यांनी सेवेत येण्यापूर्वी किंवा त्यानंतर कायद्याचे पदव्युत्तर शिक्षण (L.L.M.) प्राप्त केले असेल तर त्यांना एकदाच तीन आगाऊ वेतनवाढीचा लाभ मंजूर करण्यात येणार आहे. मात्र तीन आगाऊ वेतनवाढी, पदोन्नती किंवा आश्वासित प्रगती योजना यांचा लाभ दिल्यानंतर तसेच पदोन्नतीच्या पदाची किंवा आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वेतननिश्चिती केल्यावर त्यांना पुन्हा तीन आगाऊ वेतनवाढ देता येणार नाहीत. विधी व न्याय विभागाने ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार ही वेतनवाढ शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून मंजूर करण्यात येणार आहे.

-----o-----

परिवहन विभाग

## वाहन नोंदणीसाठी आकारल्या जाणाऱ्या एकरकमी मोटार वाहन करामध्ये वाढ

राज्यात गेल्या १ जुलैपासून जकात आणि एलबीटी हे कर रद्द झाल्यामुळे निर्माण होणारी महसुलाची हानी टाळण्यासाठी वाहन नोंदणी करताना एकरकमी आकारण्यात येणाऱ्या मोटार वाहन करामध्ये सर्वसाधारणपणे २ टक्के वाढ (Increase by २ percentage point) करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. सर्वच वाहनांसाठी उच्चतम कर मर्यादा २० लाख रुपये इतकी ठेवण्यासदेखील मान्यता देण्यात आली.

वस्तू व सेवा कर प्रणालीमुळे १ जुलै, २०१७ पासून राज्य शासनाचे जकात, एलबीटी हे कर रद्द होऊन राज्य शासनाचे महसुली उत्पन्न कमी होणार असून ही तूट भरुन काढावी लागणार आहे. उत्पन्न वाढविण्याची उपाययोजना म्हणून मोटारवाहन करांमध्ये वाढ करण्यात आली आहे. महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम-१९५८ मधील तरतुदीनुसार वाहनांच्या नोंदणीवेळी एकरकमी मोटार वाहन कर आकारण्यात येतो. यापूर्वी, दुचाकी आणि तीनचाकीवरील कराचे प्रमाण ८ ते १० टक्के या दरम्यान होते. त्यामध्ये वाढ होऊन १० ते १२ टक्के कर लागू होणार आहे. पेट्रोल इंधन आधारित मोटार कारवरील कर ९ ते ११ टक्के या दरम्यान होता, तर आता ११ ते १३ टक्के कर लावण्यात येणार आहे. डिझेल इंधन आधारित मोटार कारवरील कर ११ टक्के ते १३ टक्के या दरम्यान होता. त्यावर आता १३ ते १५ टक्के याप्रमाणे कर लावण्यात येणार आहे. सी.एन.जी. अथवा एल.पी.जी. इंधन आधारित मोटार कारवरील कर ५ ते ७ टक्के या दरम्यान होता, त्यामध्ये वाढ होऊन ७ ते ९ टक्के कर लावण्यात येणार आहे.

जास्त किंमत असणारी वाहने राज्याबाहेर नोंदणी करुन ती राज्यात वापरली जातात. यामुळे राज्य शासनाच्या महसुलाची हानी होते. हे प्रकार टाळण्यासाठी सर्वच वाहनांसाठी मोटार वाहन कराची उच्चतम कर मर्यादा २० लाख रुपये एवढी ठेवण्यात येणार आहे.

----o----

## रत्नागिरी वीज प्रकल्पास व्हॅट,सीएसटी मधून सूट

रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रा.लि. वीज निर्मिती प्रकल्पास व्हॅट, सीएसटी तसेच विजेच्या वहनावरील ट्रान्समिशन चार्जेस व लॉसेस यामधून १ एप्रिल २०१७ पासून पुढील पाच वर्षांसाठी पूर्णत: सूट देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे या प्रकल्पाच्या पुनरुज्जीवनास मदत होणार आहे.

दाभोळ (जि. रत्नागिरी) येथील रत्नागिरी गॅस ॲण्ड पॉवर प्रा.लि. (RGPPL) हा नैसर्गिक वायूवर आधारित १ हजार ९६७ मेगावॅट क्षमतेचा वीज निर्मिती प्रकल्प नैसर्गिक वायू पुरवठ्याअभावी जानेवारी २०१४ पासून बंद होता. सुमारे ८ हजार ९०० कोटी रुपयांच्या थकीत कर्जामुळे हा प्रकल्प अनुत्पादक मालमत्ता म्हणून घोषित होण्याच्या मार्गावर होता.

देशातील असे प्रकल्प पीएसडीएफ (Power System Development Fund) योजनेद्वारे पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय केंद्र शासनाद्वारे २७ मार्च २०१५ रोजी घेतला आहे. या योजनेंतर्गत रत्नागिरी प्रकल्पास नोव्हेंबर २०१५ ते मार्च २०१७ पर्यंत राज्य शासनाकडून व्हॅट, सीएसटी, वहन शुल्क यामधून पूर्णत: सूट देण्याचा निर्णय ऑक्टोबर २०१५ मध्ये घेण्यात आला होता.

एप्रिल २०१७ पासून पुढील ५ वर्षांसाठी राज्य शासनाकडून व्हॅट, सीएसटी तसेच वहन शुल्क माफ करण्याची मागणी या प्रकल्पाकडून करण्यात आली होती. हा राष्ट्रीय प्रकल्प अनुत्पादक मालमत्ता म्हणून घोषित होण्यापासून वाचविण्यासाठी आणि राष्ट्रहितासाठी हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी प्रत्येक भागधारकाला काही जबाबदारी पार पाडावी लागणार आहे. ही वस्तुस्थिती पाहता, या प्रकल्पास पुरवठा करण्यात येणाऱ्या वायूवर व्हॅट, सीएसटी तसेच निर्माण होणाऱ्या विजेच्या वहनावरील शुल्क व गळती यामधून १ एप्रिल २०१७ पासून पुढील ५ वर्षांसाठी पूर्णत: सूट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----०-----

## अनधिकृत बांधकामावरील शास्तीच्या तरतुदीमध्ये सुधारणेचा अध्यादेश पुन्हा पुनर्प्रख्यापित करण्यास मान्यता

अनधिकृत बांधकामावरील शास्तीचे दर ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकांना देण्याबाबत मुंबई महापालिका अधिनियम १८८८ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये आवश्यक तरतूद करण्यासाठी अध्यादेश काढण्यात आला होता. अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर झाले नसल्याने तो पुन्हा पुनर्प्रख्यापित करण्यासाठी राज्यपालांना शिफारस करण्यास आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मंत्रिमंडळाच्या २७ डिसेंबर २०१६ च्या बैठकीतील मान्यतेनुसार यासंदर्भातील अध्यादेश ८ जानेवारी २०१७ रोजी काढण्यात आला होता. अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठी संबंधित विधेयक २०१७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडण्यात आले होते. विधानसभेने मंजूर केलेले हे विधेयक विधान परिषदेत अद्याप संमत झाले नाही. त्यामुळे या अध्यादेशान्वये अधिनियमात करण्यात आलेल्या तरतुदींची परिणामकारकता पुढे चालू ठेवण्यासाठी अध्यादेश पुनर्प्रख्यापित करण्यास १८ एप्रिल २०१७ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ६ मे २०१७ रोजी पुनर्प्रख्यापित करण्यात आलेल्या अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठीचे विधेयक मे-२०१७ मधील विशेष अधिवेशनात सादर करण्यात आले. मात्र, आतापर्यंत अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर झाले नाही. त्यामुळे हा अध्यादेश २ जुलै २०१७ पासून पुन्हा पुनर्प्रख्यापित करण्यासाठी राज्यपालांना विनंती करण्यास आज मान्यता देण्यात आली.

-----o-----

महिला व बालविकास विभाग

एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे

## बळकटीकरण व पुनर्संरचना योजना राज्यातील उर्वरित १५ जिल्ह्यांत राबविणार

केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना राज्यातील उर्वरित १५ जिल्ह्यांत राबविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या योजनेचा आर्थिक भार केंद्र ६० टक्के तर राज्य शासन ४० टक्के असा उचलणार असून राज्याच्या वाट्याच्या खर्चास यावेळी मान्यता देण्यात आली.

एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे बळकटीकरण व पुनर्संरचना योजना एप्रिल २०१४ पासून राज्यातील २० जिल्ह्यांत राबविण्यात येते. उर्वरित १५ जिल्ह्यांत ही योजना राबविण्यास आज मान्यता देण्यात आली. त्यानुसार कोल्हापूर, उस्मानाबाद, यवतमाळ, रत्नागिरी, अकोला, लातूर, सिंधुदुर्ग, सोलापूर, सातारा, पुणे, रायगड, भंडारा, ठाणे, पालघर या जिल्ह्यांतील २३६ प्रकल्पात ही योजना राबविण्यात येणार आहे. योजनेंतर्गत महिला व बालकांच्या आरोग्य, शिक्षण, पोषणाकडे प्रामुख्याने लक्ष दिले जाते. या योजनेसाठी २०१७-१८ वर्षापासून २१० कोटी ९६ लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यातील १६० कोटी ४४ लाख रूपयांचा हिस्सा केंद्र शासन तर ५० कोटी ५२ लाख रूपयांचा हिस्सा राज्य शासन उचलणार आहे.

-----o-----

राज्य उत्पादन शुल्क विभाग

ग्रामरक्षक दलांच्या स्थापनेची प्रक्रिया वेगवान

## तहसीलदारांनी नेमलेल्या अधिकाऱ्याच्या उपस्थितीतही आता होणार ग्रामसभा

ग्रामरक्षक दलांच्या स्थापनेसाठीची प्रक्रिया वेगाने होण्यासाठी महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) अधिनियम-२०१६ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामुळे ग्रामरक्षक दल स्थापन करण्यासाठी ग्रामसभेची बैठक त्या क्षेत्राचे तहसीलदार किंवा तहसीलदारांनी नेमलेला अधिकारी यांच्या उपस्थितीत आयोजित करता येणार आहे.

ग्रामीण भागातील व्यसनाधिनता तसेच अवैध दारु व्यवसाय रोखण्यासाठी तसेच त्यानुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ग्रामरक्षक दलांची स्थापना करण्यात येते. महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०१६ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये विधेयक पारित करुन महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) अधिनियम-२०१६ लागू करण्यात आला आहे. या अधिनियमातील कलम १३४ अ (२) (क) मध्ये - "अशा ग्रामसभेची बैठक, त्या क्षेत्राच्या तहसीलदाराच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येईल," अशी तरतूद आहे. आजच्या निर्णयामुळे त्यात बदल होणार आहे.

एका तालुक्यात सुमारे शंभर गावे असतात. एकाच तालुक्यात एकाच वेळी एकापेक्षा जास्त गावांमध्ये ग्रामरक्षक दल स्थापन करण्याबाबत अर्ज आले तर ठरवून दिलेल्या मुदतीत बैठक आयोजित करणे तहसीलदारांना अडचणीचे ठरु शकते. परिणामी ग्रामरक्षक दल स्थापन करण्याची कार्यवाही वेगाने होणार नाही. ही बाब लक्षात घेऊन, ग्रामरक्षक दल स्थापना करण्यासाठी ग्रामसभेची बैठक "तहसिलदार किंवा त्या क्षेत्राच्या तहसीलदाराने प्राधिकृत केलेला राज्य शासनाच्या गट - ब दर्जापेक्षा कमी नसलेला कोणताही अधिकारी" अशी सुधारणा अधिनियमातील कलम १३४ अ (२) (क) मध्ये करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

----o----

महसूल विभाग

## अंबाझरी उद्यान आणि तलावाच्या विकासासाठी जमिनीचे व्यवस्थापन आता एमटीडीसीकडे

नागपूर शहरातील महत्त्वाचे पर्यटन स्थळ असलेल्या अंबाझरी उद्यान आणि तलावाचा विकास करण्यासाठी उद्यानांतर्गत येणाऱ्या एकूण ४४ एकर जमिनीचे व्यवस्थापन नागपूर महानगरपालिकेकडून परत घेऊन ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे (एमटीडीसी) देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

अंबाझरी तलाव व उद्यान हे नागपूर शहराचे वैशिष्ट्य असून एकूण ४४ एकर जमिनीवर वसलेल्या या उद्यानाचा सुनियोजित विकास केल्यास ते नागपूरसह राज्यासाठी प्रमुख पर्यटनस्थळ ठरु शकेल. त्यामुळे केवळ नाममात्र दराने ३० वर्षांच्या कालावधीसाठी ही जमीन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास देण्याचा निर्णय आज घेण्यात आला. या प्रकल्पामुळे महामंडळास होणाऱ्या निव्वळ वार्षिक उत्पन्नातील ५० टक्के रक्कम शासनास देण्याचे बंधन घालण्यात आले आहे. तसेच ही जमीन संबंधित प्रकल्पाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरताना महसूल व वन विभागाची पूर्वमान्यता घेणे बंधनकारक असणार आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ च्या कलम ३८ व ४० अन्वये प्राप्त अधिकारानुसार महामंडळास ही जमीन देण्यात आली असली तरी यानुसार घालून देण्यात आलेल्या अटी शर्तींचा भंग झाल्यास ती परत घेण्याचे अधिकार शासनास असतील.

-----o-----

महाराष्ट्र मुद्रांक नियमात सुधारणा

**वार्षिक मूल्यदर तक्त्यांसोबत मार्गदर्शक सूचनांचा समावेश**

वार्षिक मूल्यदर तक्त्यांचा (रेडी रेकनर) अविभाज्य भाग असणाऱ्या मूल्यांकनाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना प्रत्येक वर्षी वार्षिक मूल्यदर तक्त्यासोबत प्रसिद्ध करण्यात येतात. मात्र, या तक्त्यासोबत मार्गदर्शक सूचना लागू करण्याबाबत महाराष्ट्र मुद्रांक नियम-१९९५ मध्ये तरतूद नाही. त्यामुळे या मार्गदर्शक सूचना लागू करण्याबाबत सुस्पष्ट उल्लेख असणारी तरतूद समाविष्ट करण्यासाठी या नियमात सुधारणा करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम-१९९५ मधील तरतुदीनुसार प्रत्येक वर्षी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक तथा मुख्य महसूल नियंत्रक अधिकारी हे वार्षिक मूल्यदर तक्ता प्रसिद्ध करीत असतात. यासोबत देण्यात येणाऱ्या मागर्दर्शक सूचनांचा वापर करून वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दराच्या आधारे दुय्यम निबंधक यांच्याकडून दस्त मिळकतीचे बाजारमूल्य निश्चित करण्यात येते. त्यामुळे मार्गदर्शक सूचनांना कायदेशीर आधार देण्याच्या दृष्टीने संबंधित नियमांमध्ये सुस्पष्ट तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. आजच्या निर्णयानुसार महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ६९ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम-१९९५ मधील नियम क्र. २ च्या पोटनियम (१) मध्ये नव्याने खंड (एफ१) समाविष्ट करणे, तसेच नियम क्र. ४ (२), ४ (३), ४ (५), ४ (६) मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच या सुधारणा तातडीने करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ६९ च्या पोटकलम (३) च्या परंतुकातील तरतुदीनुसार या सुधारणा नियमांची पूर्वप्रसिद्धी करण्याची अट वगळण्यास मान्यता देण्यात आली.

-----०-----